# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि–५ महाराष्ट्र अधिनियम १९९४(१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापीत राज्य विद्यापीठ

**( परीक्षा व मुल्यमापन मंडळ)**

एम.आय.डी.सी.रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली–४४२६०५

फोन नंबर ०७१३२–२२३१०४ E-mail Id – coegondwana@gmail.com

जा.क्र./गों.वि./परीक्षा विभाग/१८३५/२०१७ दि. २७/०९/२०१७

## अधिसुचना

गोंडवाना विद्यापीठ, अंतर्गत हिवाळी–२०१७ परीक्षेची कार्यवाही सुरू असुन खालील प्रमाणे सुचना निर्गमित करण्यात येत आहे.

१) सर्व परीक्षा केंद्राधिकाऱ्यांना कळविण्यात येते की, हिवाळी–२०१७ च्या परीक्षा दिनांक ०५/१०/२०१७ पासुन सुरू होत आहे सदर परीक्षेकरीता लागणारे आवश्यक दस्ताऐवज (**Roll List, Invigilator Diary, Numerical Report, Paper Wise Attendance Sheet & Junior Supervisor Report**) व परीक्षेसंबंधीत माहीती ही **www.unigug.org** या विद्यापीठाचे संकेत–स्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. करीता महाविद्यालयांनी आपल्या महाविद्यालयांच्या **Login Id** वर ही माहीती तपासुन घ्यावी याबाबत काही त्रृटी असल्यास खास दुता मार्फत विद्यापीठात लेखी कळवावे. परीक्षेचे प्रवेशपत्र महाविद्यालयाच्या **Login ID** वर निर्गमित करण्यात आलेले आहेत करीता नोंद घ्यावी.

२) ज्या विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क भरूनच परीक्षा आवेदन पत्र विद्यापीठात सादर केलेले आहे. अशाच विद्यार्थ्यांना परीक्षा प्रवेश पत्र ( **Hall Ticket** ) वितरीत करण्यात यावे. ज्या विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदन पत्र व शुल्क विद्यापीठात सादर केले नाही अशा विद्यार्थ्यांचे परीक्षा प्रवेशपत्र (**Hall Ticket**) प्राचार्यांनी प्रमाणित करून वितरीत करू नये वितरीत केल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत महाविद्यालयाच्या प्राचार्यांची राहील, याची नोंद घ्यावी.

३) विद्यार्थ्यांचे परीक्षा प्रवेश पत्र ( **Hall Ticket** ) वर काही त्रृटी ( नाव, विषय, कोर्स, माध्यम व परीक्षा केंद्र किंवा इतर त्रृटी ) असल्यास त्रृटी दुरूस्ती करण्याकरीता त्यांच्या पुराव्यासह संबंधीत लिपीकाने सहा. कुलसचिव परीक्षा पुर्व यांना विशेष दुतामार्फत संबंधित परिक्षेच्या ३ दिवस आधी कळवुन त्यांची लेखी पोच घ्यावी. परस्पर विद्यार्थ्यांना विद्यापीठात पाठवू नये.

४) सर्व अभ्यासक्रमाध्ये विद्यापीठाच्या नियमानुसार विद्यार्थ्यांचे प्रवेश झालेले नसल्यास तसेच विद्यापीठाच्या नियमानुसार परीक्षा आवेदनपत्र भरलेले नसताना सुध्दा त्या विद्यार्थ्यांचे ( **Hall Ticket** )विद्यापीठाद्वारे निर्गमित झाले असल्यास सदर प्रवेशपत्र विद्यार्थ्यांना देण्यात येवू नये सदर विद्यार्थ्यांचे (**Hall Ticket** ) रद्द करण्याकरीता सहा. कुलसचिव ( परीक्षा पूर्व ) यांना विशेष दुतामार्फत कळविण्यात यावे.

५) मागील परीक्षेमध्ये असे निदर्शनास आले आहे की, परीक्षा केंद्रावर विद्यार्थ्यांचे विषय बदल, माध्यम बदल व इतर बाबीमध्ये बदल करून विद्यार्थ्यांकडून **Undertaking** घेऊन त्यांना परीक्षेला बसवितात. या परीपत्रकाद्वारे सर्व परीक्षा केंद्राधिकाऱ्यांना कळविण्यात येते की, वेळेवर कोणतेही विद्यार्थ्यांचे विषय /माध्यम बदल व इतर बाबीमध्ये बदल करू नये व **Undertaking** घेऊन परीक्षेला बसवू नये. तसे केल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत केंद्राधिकारी यांची राहील. या बाबतीत परीक्षा विभागाशी संपर्क साधूनच आवश्यक कार्यवाही करावी.

६) परीक्षेमधील गैरप्रकाराचा ( **UF** ) उत्तरपत्रिका संबंधित पुराव्यासह व आवश्यक दस्ताऐवजासह स्वतंत्र बंडल मध्ये विद्यापीठात पाठविण्यात यावे. बंडल वर ठळक अक्षरात विद्यार्थ्यांचा बैठक क्रमांक नमुद करावा. सदरचे सर्व प्रपत्र विद्यापीठाच्या संकेत स्थळवर उपलब्ध आहेत.

७) विद्यापीठाद्वारे परीक्षा प्रवेशपत्र (**Hall Ticket**) दिनांक २७/०९/२०१७ ला निर्गमीत करण्यात आले असुन सदर दिनांका नंतरचेच सर्व **Report** ग्राहय धरावे तसेच अद्यावत वेळापत्रक सुध्दा तपासून घ्यावे.

८) परीक्षा केंद्रावर उत्तरपत्रिका व इतर परीक्षे संबंधीत आवश्यक साहीत्य या बाबत सेंटर रिपोर्ट प्रमाणे शहानिशा करून काही अडचणी असल्यास परीक्षेच्या दोन दिवस पुर्वी विद्यापीठात संपर्क साधावा.

क्षार्थींनीने प्रवेश पत्रावर दिलेल्या सर्व सुचनांचे तंतोतंत पालन करने आवश्यक आहे आणि करीता विद्यार्थ्यांनी पेपर सोडवितांना काळया शाईचे बॉल पेन वापरावे

१०) या परीक्षेकरीता उत्तर पत्रिकेत बैठक क्रमांक चे एकुण दहा रकाने देण्यात आले असून विद्यार्थ्यांनी आपला बैठक क्रमांक ( **Roll No.** ) उत्तरपत्रिकेत स्लीप–१ व स्लीप–३ मध्येही लिहावा आणि पर्यवेक्षक तथा केंद्राधिकारी यांनी परीक्षार्थ्यांनी लिहीलेला रोल नंबर बरोबर असल्याचे खात्री करूनच स्वाक्षरी करने बंधनकारक आहे तसेच उत्तरपत्रिकेत दहा रकने व परिक्षा क्रमांक सात अंकी असल्यामुळे आधीच्या रकान्यात ००० लिहून नतंर परिक्षा क्रमांक लिहावा तशा सुचना परिक्षार्थ्यांना देण्यात यावे.

११) सर्व विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रावर जातांना सोबत ओळखपत्र जवळ ठेवणे गरजेचे आहे तशा सुचना महाविद्यालयाने विद्यार्थ्यांना दयाव्या.

१२) परिक्षेदरम्यान विद्यापीठाद्वारा निर्गमित होणाऱ्या सूचनांचे प्रसारण/प्रकाशन करून संबंधीत माहीती विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविणे महाविद्यालय प्रशासनाची जवाबदारी राहील.

१३) सर्वच परीक्षा केंद्रावर **Secured online Question paper delivery** करण्यात येत आहे. त्यामुळे इंटरनेट, मोबाईल, सेवा अखंडीत सुरू राहाव्या तसेच विद्युत पुरवठा अखंडीत सुरू राहावा, परीक्षा केंद्रावर सुरक्षा व्यवस्था, या दृष्टीने स्थानीक संबंधीत विभाग प्रमुखांना लेखी सुचना प्राचार्यांनी देऊन सेवा उपलब्धेबाबत आवश्यक कार्यवाही करावी.

१४) **Online Question Paper Delivery to Examination Center** करीता विद्यापीठात निर्देश क्रं. १८८/२०१६ निर्गमित केलेले आहे. त्यानुसार प्रत्येक परीक्षा केंद्रावर परीक्षा पार पाडणे प्राचार्यांची जबाबदारी आहे.

१५ ) परीक्षे दरम्यान परीक्षा केंद्राधिकारी/सह परीक्षा केंदाधिकारी यांनी प्रश्नपत्रिका वितरीत करीत असतांना विद्यार्थ्यांच्या प्रवेश पत्र **(Hall Ticket)** वर जे माध्यम देण्यात आलेले असेल त्या माध्यमाची प्रश्नपत्रिका विद्यार्थ्यालि प्राप्त झाली कि नाही याची शहानिशा करावी अन्यथा सर्वस्वी जबाबदारी परीक्षा केद्राधिका
री यांची राहील.

१६) परीक्षेला बसलेले दिव्यांग विद्यार्थ्यासंबंधी महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण–२०१६/प्र.क्र. ३०२/विशि–३ दिनांक ०४ मार्च २०१७ नुसार कार्यवाही करावी. व काही अडचण निर्माण झाल्यास विद्यापीठाशी संपर्क साधावा.

१७) परीक्षेच्या काळात परीक्षा विभागाव्दारे वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या सुचनांचे पालन करावे.

१८) परिक्षा केंद्रावर उपलब्ध झालेल्या उत्तरपत्रिकेचा वापर उत्तर पत्रिकेच्या अनुक्रमांकानुसार क्रमशः करावा.

१९) परिक्षा केंद्रावरिल परिक्षेसंबंधी दस्ताऐवज (इंनव्हिजीलेटर डायरी, अटेडन्स शीट, (उपस्थितीपत्रक) इ. परिक्षा संपल्यानंतर विद्यापीठात जमा करणे अनिवार्य आहे.

२०) उत्तर पत्रिकेच्या बाबतीत श्री सत्यम नरगडे (उच्च श्रेणी लिपीक) यांचे सोबत (मो. न ९२२६५९९६७०) संपर्क साधावा

२१)परिक्षे संबंधीत माहिती विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावरिल ग्राहय धरण्यात यावी. व वेळोवेळी निर्गमीत होणारे सुचना आपल्या सुचना फलकावर प्रकाशित करून परिक्षार्थ्यांना माहिती द्यावी.

विद्यापीठात परीक्षा सुरळीत घेण्याच्या दृष्टीने सर्व सुचनांचे काटेकोरपणे पालन होणे आवश्यक असुन परीक्षेत होणाऱ्या चुका तसेच विद्यार्थ्याचा मानसिक ताण वाचू शकेल याबाबत सर्व प्राचार्य व केंद्राधिकाऱ्यांनी सहकार्य करावे.

संचालक,
(डॉ. जे. व्ही. दडवे),
परीक्षा व मुल्यमापन मंडळ
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

<u>संपर्क करीता दुरध्वनी:–</u>
परीक्षा (पुर्व) :– ०७१३२–२२३३५२, ८२७५६८२३००
परीक्षा (उपरांत) :– ७७७४०२७ ६६९, ९४०३४३६५९३
गोपनिय विभाग ०७१३२–२२३३५०, ७७७४०२७६६९
<u>परीक्षा प्रवेश पत्र Online उपलब्ध नसल्यास संपर्क</u>
संगणक विभाग :– ०७१३२–२२३१०८, ९४२१७८४६५६